



# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे





✻ कराड (जि.सातारा) ✻ वर्ष - २ रे. ✻ अंक ९९ वा. ✻ रविवार दि.०५ ऑक्टोबर २०२५ ✻ पृष्ठे ४ ✻ किंमत : १ रुपये ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610

✻ Karad (Dis.Satara) ✻ Vol - 2 ✻ Ishue - 99 ✻ Sunday 05 October 2025 ✻ Page - 4 ✻ Price - 1 Rs. ✻ RNI NO : MAHMAR/2024/86610


# शासन आणि जनता यामधील दुवा म्हणून काम करा : मंत्री शंभूराज देसाई



सातारा : शासन आणि जनता यामधील खरी कडी म्हणजेच शासकीय कर्मचारी. शासनाच्या कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सकारात्मक दृष्टीकोनातून करा. नियुक्ती सहजपणे मिळाली याची जाणीव ठेवा आणि सेवा काळात लोकांना त्याचा लाभ जलदगतीने मिळेल यासाठी तत्परतेने काम करा. जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून मी तुमच्या पाठीशी ठामपणे उभा राहीन, असे आश्वासन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा व जिल्हा प्रशासन यांच्या वतीने आयोजित अनुकंपा उमेदवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या लिपिक-टंकलेखक पदांवरील उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरणाचा कार्यक्रम स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृहात पार पडला.

यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराज, अप्पर जिल्हाधिकारी मल्लिकार्जुन माने, अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील आदी उपस्थित होते.

शासन निर्णय सुलभ, प्रक्रिया पारदर्शक या कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शासनातील रिक्त पदे तातडीने भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली १७ जुलै २०२४ रोजी अनुकंपा भरतीसाठी सुटसुटीत शासन निर्णय काढण्यात आला. पूर्वी अनुकंपा भरतीसंदर्भात तब्बल ४५ निर्णय होते, परंतु आता एकत्रित व पारदर्शक धोरण राज्यात राबवले जात आहे. सातारा जिल्ह्यात याच धोरणानुसार १७२ अनुकंपा धारकांना व २४८ एमपीएससीमार्फत उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली.

पालकमंत्री शंभूराजे देसाई म्हणाले, आपण जनतेचे सेवक आहोत ही जाणीव सतत ठेवा. नोकरी मिळणे हा आनंदाचा क्षण असला तरी त्याच वेळी जबाबदारीही मोठी असते.

नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा सुटसुटीत, सुलभ व तत्पर असाव्यात. गतिमान प्रशासन, माझी शाळा आदर्श शाळा, स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र आदी उपक्रमांत सातारा जिल्हा अग्रेसर आहे. जिल्ह्याचा लौकिक वाढविण्यासाठी तुमचे योगदान महत्त्वाचे आहे.

जिल्हाधिकारी संतोष पाटील म्हणाले, महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच अनुकंपा तत्त्वावरील व एमपीएससीत उत्तीर्ण उमेदवारांना एकत्र नियुक्तीपत्र देण्याचा उपक्रम पार पडला आहे. अनुकंपा धोरण हे शासनाच्या मानवी चेहऱ्याचे प्रतीक आहे. शासकीय सेवेमध्ये प्रविष्ट होणे हा कुटुंबासाठी आनंदाचा क्षण असतो. मात्र ही नोकरी मिळाल्यानंतर समाजाप्रती जबाबदारी अधिक वाढते.

सेवा या शब्दाचा खरा अर्थ तुमच्या कामातून दिसला पाहिजे. मोठ्या संख्येने उपस्थिती या कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, नियुक्त झालेले उमेदवार व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी केले.

# कराड अर्बन बँकेच्यावतीने वाहनांचे वितरण

## ५९०० कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण : धनंजय शिंगटे



कराड : दि कराड अर्बन को-ऑप. बँकेच्या वतीने ग्राहकांना १५ कोटी पर्यंतचे विविध वाहन कर्ज बँकेच्या माध्यमातून वितरीत करण्यात आले आहे. कराड शहरातील वाहनांचे पूजन समीर जोशी, डॉ. अनिल लाहोटी, संचालक मंडळाचे सदस्य, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. धनंजय शिंगटे यांचे हस्ते करुन वाहनांचे वितरण करण्यात आले.

बँकेचे ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी, डॉ. सुभाष एरम यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने सामाजीक उपक्रमांबरोबरच ग्राहकांना कमी व्याजदरात वाहने उपलब्ध करुन दिली आहेत. बँकेने नवीन वाहन खरेदीसाठी ग्राहकांना विविध शाखांच्या माध्यमातून एकूण १५ कोटी कर्जाचे वितरण केलेले असून यापैकी कराड विभागातून सुमारे ५ कोटी वाहन कर्जाचे वितरण करण्यात आलेले आहे.

बँकेने नवीन वाहन खरेदीसाठी ग्राहकांचे हित लक्षात घेत घरगुती वाहन खरेदीसाठी ८.५०% व कमर्शिअल वाहन खरेदीसाठी ९.००% अशी योजना राबविली असून याला ग्राहकांचा भरभरुन प्रतिसाद मिळत आहे.

जीएसटीमधील कपातीचा वाहन खरेदी करताना ग्राहकांना चांगलाच फायदा झाला आहे.नुकत्याच संपलेल्या अर्धवर्षाअखेरीस वार्षिक नियोजनाप्रमाणे बँकेने एकूण रुपये ५९०० कोटीचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण करीत नेट एन.पी.ए. चे प्रमाण शून्य टक्के कायम ठेवले आहे. बँकेचे ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी, डॉ. सुभाष एरम यांच्या मार्गदर्शनामुळे आणि सर्व सेवकांच्या सामुहिक योगदानामुळे हे यश मिळवता आले आहे, असे उद्गार मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. धनंजय शिंगटे यांनी वाहन वितरणाच्या कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. कराड अर्बन बँक ग्राहकांना फक्त आर्थिक पतपुरवठा करत नाही तर योग्य सल्ला देवून आर्थिक शिस्त सुद्धा लावते.

यामुळे ग्राहकांना आर्थिक प्रगती करणे सोपे जाते. कराड अर्बन बँक नेहमीच सर्वोत्तम ग्राहक सेवा देत आली असल्याचे समाधान वाहनधारकांनी व्यक्त केले. कराड ग्रामीणचे उपमहाव्यवस्थापक अतुल शिंदे, विजय पाटील, शाखा अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# जागतिक हृदय दिनानिमित्त जनजागृती उपक्रम

## कृष्णा विद्यापीठात पोस्टर व रांगोळी स्पर्धा




कराड : कृष्णा विश्व विद्यापीठाच्या हृदयरोग विभागाच्यावतीने जागतिक हृदय दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित पोस्टर व रांगोळी स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी हृदयविकाराबाबत प्रभावी जनजागृती केली.

स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे, मेडिकल डमिनिस्ट्रेटर डॉ. आर. जी. नानिवडेकर, वैद्यकीय विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. युगांतरा कदम, हृदयरोग विभागप्रमुख डॉ. अभिजीत शेळके व डॉ. वसुंधरा घोरपडे यांच्या हस्ते झाला. डॉ. विजय कणसे म्हणाले, कमी वयात हृदयरोगाचे प्रमाण वाढत आहे. तरुणांनी नियमित व्यायाम, संतुलित आहार व मानसिक संतुलन या तिन्ही बाबींवर लक्ष केंद्रीत केल्यास हृदयविकार टाळता येऊ शकतात. डॉ. युगांतरा कदम यांनी मनः स्वास्थ्याचे महत्त्व अधोरेखित केले. राग, द्वेष, मत्सर व लोभ यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. संतुलित मन म्हणजे निरोगी हृदय, असे त्या म्हणाल्या.डॉ. आर. जी. नानिवडेकर यांनी ताण-तणाव नियंत्रण, व्यायाम व योग्य आहाराचे महत्त्व स्पष्ट केले. जीवनशैली बदलणे हे शारीरिकासोबतच मानसिक इच्छाशक्तीवर अवलंबून आहे, असे ते म्हणाले. डॉ. अभिजीत शेळके म्हणाले, नियमित व्यायाम, वेळोवेळी तपासणी व तातडीने वैद्यकीय मदत घेतल्यास हृदयविकारामुळे होणारे तब्बल ८० टक्के मृत्यू टाळता येऊ शकतात. डॉ. वसुंधरा घोरपडे यांनी शालेय वयापासून मुलांमध्ये योग्य जीवनशैली रुजविण्याची गरज व्यक्त केली. स्वतःच्या शरीराशी संवाद साधणे, बदल समजून घेणे आणि अवयवांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

# महाराष्ट्रावर 'शक्ती'चे संकट



मुंबई : महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांत पावसाने उसंत घेतली आहे. मात्र मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी पुढील काही दिवस धोक्याचे ठरू शकतात. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, अरबी समुद्रात शक्ती चक्रीवादळ धडकणार आहे. या हंगामातील हे पहिले चक्रीवादळ असून ते काल तीव्र झाले आहे. मात्र आज ते अधिक तीव्र चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. शक्ती चक्रीवादळामुळे महाराष्ट्रासाठी हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

या तीव्र शक्ती चक्रीवादळामुळे पुढील काही दिवसांत राज्यात सोसाट्याच्या वा-यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. चक्रीवादळाचा वेग, उंच लाटा यामुळे समुद्रातील परिस्थिती खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्य प्रशासनाने सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित केली असून स्थलांतराच्या उपाययोजनांचीही तयारी केली आहे.

हवामान विभागाने चक्रीवादळामुळे महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा दिला असून, ७ ऑक्टोबरपर्यंत मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना अधिक सतर्क राहण्याचे सांगण्यात आले आहे.

# मसूरच्या मॅक्स इम्पॅक्ट फाउंडेशनचा मानवतावादी उपक्रम

## पूरग्रस्तांना जीवनावश्यक किट व कपडे




मसूर : निसर्गाच्या वक्रदृष्टीमुळे सोलापूरसह धाराशिव जिल्ह्यातील परांडा आणि भूम तालुक्यात अतिवृष्टी व पुरामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली.

घरे, शेतातील पिके, धान्य, जनावरे वाहून गेल्याने पूरग्रस्त कुटुंबांना उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. अशा संकट काळात मसूर (ता. कराड) येथील मॅक्स इम्पॅक्ट फाउंडेशनच्या युवक कार्यकर्त्यांनी मानवतावादी दृष्टिकोन ठेवून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धाव घेतली.

फाउंडेशनच्या वतीने लोकसहभागातून मदत गोळा करून ३०६ जीवनावश्यक किराणा किट, ३०० साड्या व मुलांसाठी कपडे थेट घरपोच वाटप करण्यात आले. प्रत्येक किटमध्ये तांदूळ, पीठ, डाळ, साखर, मसाले, मीठ व तेल यांसारख्या आवश्यक वस्तूंचा समावेश होता.

या मदत कार्यात समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ मसूर, लायन्स क्लब मसूर आणि स्थानिक ग्रामस्थ यांनी सक्रिय सहभाग घेतला. युवक प्रतिक संकपाळ, मेहुल शहा, अनुराग हुबाले, जय धरमसी, अपूर्व शहा, विक्रम शिंदे, संभाजी पोळ, दिलीप संकपाळ, महेंद्र शहा, वैभव खूडे, राहुल शेटे आदी २० कार्यकर्त्यांच्या टीमने गावोगावी जाऊन पूरग्रस्तांना दिलासा दिला.

**मॅक्स इम्पॅक्ट फाउंडेशनचा हा उपक्रम केवळ मदतीपुरता मर्यादित न राहता मानवी संवेदनांचा आदर्श ठरला असून पूरग्रस्तांच्या मनात नव्या आशेचा किरण निर्माण करणारा ठरला आहे.**

# रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाने जपली बांधिलकी

## ४५ जणांचे १ महिन्याचे सव्वालाख मानधन पूरग्रस्तांना




कराड : महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागातील माणसांना मदतीचा हात म्हणून रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या सर्व सदस्यांनी एक महिन्याचे संपूर्ण मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिले. ४५ सदस्यांनी एक लाख २० हजार मानधन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली.

मंडळाचे सदस्य जुगलकिशोर ओझा यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील काही भाग पुरात नेस्तनाबूत होत असताना साऱ्यांनीच त्यांना मदतीचा हात देणे गरजेचे आहे. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाने अध्यक्ष विजय गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली ही मदत दिली.

सर्वांनी आपले एक महिन्याचे मानधन असे एकूण एक लाख वीस हजार रुपये मुख्यमंत्री साहाय्यता निधीसाठी देण्यात आले. या अचानक आलेल्या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्यापरीने महाराष्ट्राला या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन मंडळाकडून करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

**रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, महाराष्ट्र शासनाचे आम्ही सर्व सदस्य पूरग्रस्त भागातील माणसांना मदत म्हणून आमचे एक महिन्याचे मानधन पूरग्रस्त मदत निधीला १ लाख २० हजार सामाजिक बांधिलकीतून देत आहोत.**

**- जुगलकिशोर ओझा, सदस्य - रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळ, महाराष्ट्र शासन**

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत ओम जगदाळे प्रथम



मसूरः फलटण येथे जिल्हास्तरीय झालेल्या शालेय शासकीय कुस्ती स्पर्धेमध्ये आदर्श विद्यामंदिर हणबरवाडी (ता कराड) विद्यालयातील ओम आनंद जगदाळे याने ४८ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला. विभागीय स्तरीय फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. विद्यालयातील ४५ किलो वजन गटात संचित स्वप्नील धस याने द्वितीय क्रमांक पटकावला.५१ किलो वजनी गटात सोहम संतोष ढेरे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक विक्रमसिंह काळभोर, वस्ताद इंद्रजीत तनपुरे यांनी मार्गदर्शन केले. यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत असून त्याचे मानसिंगराव जगदाळे युवा प्रतिष्ठानतर्फे सत्कार करून गौरवण्यात आले तसेच संस्थेचे सचिव दिलीपराव शिंदे सर यांनी अध्यक्ष जयसिंगराव जाधव आबा तसेच मार्गदर्शक संचालक तानाजीराव देशमुख सर मुख्याध्यापक हंबीरराव काळभोर यांनी अभिनंदन केले.

## संपादकीय....

# दसरा मेळावे

दसरा मेळाव्याची परंपरा ही शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राला दिलेली एक वैचारिक देणगी आहे. वर्षातून एकदा, दसऱ्याच्या शुभदिनी, बाळासाहेबांनी महाराष्ट्रातील तमाम मराठी शिवसैनिकांसोबतच देशभरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या भाषणात महाराष्ट्राचे प्रश्न, देशाच्या घडामोडी आणि समाजजीवनावरील प्रखर भाष्य असे. राजकारणातील पाखंडीपणा उघड करतानाच मराठी माणसाला आत्मभान देणारी ही वैचारिक सोन्याची वाटणी होती. परंतु गेल्या काही वर्षांत या परंपरेचे स्वरूप झपाट्याने बदलू लागले आहे. यंदा तर दसरा मेळावा एकाच नव्हे तर तब्बल पाच ठिकाणी पार पडला. प्रत्येक राजकीय पक्ष, प्रत्येक नेतेमंडळी आपल्या संघटनेला संदेश देण्यासाठी, समाजाला आपले विचार मांडण्यासाठी या व्यासपीठाचा वापर करताना दिसले. ही वैचारिक परंपरा विस्तारत आहे हे स्वागतार्ह असले, तरी त्याचबरोबर त्यात विकृतीही डोकावू लागली आहे. दसरा मेळावा म्हणजे आदर्श, विचारमंथन आणि राजकीय दिशा ठरवण्याचे व्यासपीठ असावे अशी अपेक्षा असते. पण अलीकडे काही ठिकाणी या व्यासपीठावरून खालच्या पातळीवरील आरोप-प्रत्यारोपांचा कल्लोळ ऐकायला मिळतो. वैचारिक मंथनाऐवजी वैचारिक अध:पतन होत असल्याची खंत अनेकांना वाटते. शिवसेनाप्रमुखांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन समाजासाठी काय करायचे, काय टाळायचे, कोणते प्रश्न पुढे आणायचे यावर चर्चा व्हायला हवी होती; मात्र अनेक ठिकाणी केवळ राजकीय स्पर्धा व वैयक्तिक टिका यालाच महत्त्व दिले जात आहे. दसरा मेळाव्याचे मूळ उद्दिष्ट म्हणजे समाजाचे वैचारिक प्रबोधन. लोकांच्या मनात सकारात्मक विचारांची पेरणी करणे, नवे दिशादर्शन करणे आणि महाराष्ट्राच्या प्रश्नांना धैर्याने सामोरे जाण्यासाठी प्रेरणा देणे हे त्यामागील तत्त्व आहे. अशा व्यासपीठावरून पक्षीय स्वार्थ बाजूला ठेवून व्यापक सामाजिक प्रश्नांचा विचार होणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रातील जनता जागरूक आहे. ती फक्त आरोप-प्रत्यारोप ऐकून समाधानी राहणारी नाही. जनता ठोस उपाययोजना, समाजहिताचे धोरण आणि सकारात्मक राजकीय विचार यांची अपेक्षा करते. त्यामुळे कोणत्याही पक्षाचा दसरा मेळावा केवळ शोभेपुरता न राहता विचारांची खाण ठरली पाहिजे. समाजातील तरुणाईला प्रेरणा देणारा, शेतकरी, कामगार, महिला, मागासवर्गीय यांच्या प्रश्नांना न्याय देणारा असा दसरा मेळावा हाच खरी परंपरा टिकवू शकेल. राजकारणातील वादळांमध्येही बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केलेली ही परंपरा आजही ताजी ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक राजकीय पक्षावर आहे. दसरा मेळावा वैचारिक सोने वाटण्याचे व्यासपीठ ठरावे, की केवळ कीचाळ माजवण्याचे ठिकाण, हे ठरवणे आता जनतेच्या विवेकावर आहे.

# राजमाने ॲग्रोमुळे युवकांचे जीवनमान उंचावणार : गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी



औंध : राजमान्य ॲग्रो मुळे औंध भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असून युवकांनी, शेतकऱ्यांनी या माध्यमातून आपले जीवनमान उंचवावे असे आवाहन औंध संस्थानच्या अधिपती गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांनी केले. दसऱ्यानिमित्त औंध येथील राजमान्य ॲग्रो प्रोसेसिंग कंपनीच्या शेअर्सचे प्रतिनिधिक वाटप कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी सुनीता दाभाडे यांनी स्वागत केले कंपनीचे संचालक सुरेश दाभाडे, हणमंतराव शिंदे, राजेंद्र माने, विवेक दाभाडे, फारुख शेख, अध्यक्ष सुनीता दाभाडे, दिलीप दाभाडे ,प्रा प्रदिप गोडसे , प्रदीप कणसे, विठ्ठल घार्गे, श्रीपाद सुतार, रणजित भोसले, शुभम दाभाडे, विशाल दाभाडे, सौरभ दाभाडे उपस्थित होते.

श्रीमंत गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी म्हणाल्या, राजमान्य ॲग्रो प्रोसेसिंग कंपनी येत्या काळात औंधसारख्या दुष्काळी भागात नव्या क्रांतीचे उदाहरण ठरणार आहे. कंपनीच्या विस्तारामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत आणि कृषी-आधारित उद्योगांमध्ये नवचैतन्य निर्माण होणार आहे.

यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार असून, औंध परिसरात कृषी व औद्योगिक क्षेत्रात संतुलित विकास साधण्याचे प्रयत्न साकार होतील. हणमंतराव शिंदे यांनी कंपनीच्या उत्पादन व विस्तार धोरणाची माहिती उपस्थितांपर्यंत पोहोचवली.प्रास्ताविक व सूत्रसंचालन दिलीप दाभाडे यांनी केले. आभारप्रदर्शन सुरेश दाभाडे यांनी मानले.

# एम.डी.पवार पीपल्स बँकेचा ११ टक्के लाभांश जाहीर




इस्लामपूर : एम.डी. पवार पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांना यंदा ११ टक्के लाभांश वार्षिक सर्वसाधारण सभेत निर्णय जाहीर करण्यात आला. सर्व तरतुदीनंतर बँकेला ६९ लाख ३२ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. अध्यक्षस्थान चेअरमन अलकादेवी अशोकराव पवार यांनी भूषवले. उपाध्यक्ष प्रकाश चव्हाण, संचालक मंडळ, माजी नगरसेवक वैभव पवार, माजी नगरसेवक अमित ओसवाल, अजित पाटील, विजय पवार उपस्थित होते.

अलकादेवी पवार म्हणाल्या, बँक ९९ वर्षे सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक हितासाठी कार्यरत असून ग्राहकांसाठी आधुनिक सुविधा पुरविण्याबाबत तत्पर आहे. सध्या मोबाईल बँकिंग, एटीएम सेवा सुरू असून यूपीआय सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. बँकेच्या पारदर्शक कारभारामुळे ६६ कोटींहून अधिक ठेवींचे संकलन झाले असून ४५ कोटी रुपयांची कर्जवाटप केली आहे. वैभव पवार यांनी अहवाल सादर करताना आष्टा व शिराळा येथे लवकरच बँकेच्या नव्या शाखा सुरू होणार असल्याची घोषणा केली. स्वागत व विषयवाचन मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष आवटी यांनी केले.

सूत्रसंचालन जनरल मॅनेजर महेश गायकवाड यांनी केले तर आयटी विभाग प्रमुख रोहित पाटील यांनी नव्या सुविधा सभासदांसमोर मांडल्या. आभार तज्ञ संचालक चंद्रकांत खंकाळे यांनी मानले.

# अनुकंपातील उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानले आभार

सातारा : अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना शासन सेवेचे नियुक्तीपत्र मिळण्यास बराच कालावधी लागत होता, परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राबविलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमामुळे आम्हाला शासन सेवेतील नियुक्तीपत्रे लवकर मिळाली. यामुळे आमच्या कुटुंबाला आर्थिक स्थिरता मिळणार आहे, अशा भावना व्यक्त करुन अनुकंपा तत्वावरील भरती झालेल्या उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह शासन आणि प्रशासनाचे आभार मानले.

अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना शासन सेवेतील नियुक्तीपत्र देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शिबीराचे आयोजन केले होते. या शिबीरामध्ये सविस्तर असे मार्गदर्शन करुन शैक्षणिक अर्हतेनुसार कोणत्या पदासाठी पात्र आहोत याची सविस्तर माहिती देवून पदाचे पसंती क्रमांक घेतले. शिबीराच्या प्रसंगी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून सर्व बाबतीत मार्गदर्शन करत होते.

अनुकंपाधारकांना नियुक्ती पत्र वेळेत मिळत नाही हा आमचा गैरसमज यामुळे दूर झाला. विहित मुदतीत आमच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. तसेच आम्हाला आलेल्या अडचणींचे निरसनही अधिकाऱ्यांनी केले. आता आम्ही शासनाचे एक भाग झालो आहोत. पुढील काळात आमच्या पदाचा वापर समाजाच्या हितासाठी करणार असल्याचीही भावना यावेळी अनेक उमेदवारांनी व्यक्त केल्या

# पूरग्रस्तांनी मानले कराडकरांचे आभार



कराड : मराठवाड्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील लाखी, इडा, भूम गावातील पूरग्रस्तांना गब्बर ग्रुप, आपले कराड ग्रुप, एम. एच. ५०, रणजीतनाना पाटील मित्र परिवाराच्या वतीने मदत देण्यात आली. ही मदत या गावी पोच करण्यात आली. या मदतीबद्दल पूरग्रस्तांनी कराड शकरांचे आभार मानले.

पूरग्रस्तांना २४२ अत्यावश्यक किट व पाणी बॉटल ब्लँकेट, महिलांसाठी साड्या, लहान मुलांचे कपडे या सर्व वस्तू देण्यात आल्या. ग्रुप तर्फे तेथे जाऊन पाहणी करून गरजू लोकांना आपण दिलेली मदत पोहोचविण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

त्यावेळी रोहित पंडीत (सुतार),विजय निकम किरण शिंदे,ओंकार पंडीत उपस्थित होते. सर्व कराडकरांचे व मदत करणाऱ्यांचे त्यांनी आभार मानले त्यांनी आभार मानले.

# माय मराठीच्या संवर्धनाची जबाबदारी सर्वांची:राजेंद्र घावटे



पिंपरी : माय मराठीला समृद्ध असा वारसा लाभलेला आहे. प्राचीनता, श्रेष्ठता, स्वयंभूपणा आणि सलगता या निकषावर अभिजात दर्जा मिळाला आहे. व्यवहारात आपाल्या भाषेचा जाणीवपूर्वक वापर करून तिचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक व व्याख्याते राजेंद्र घावटे यांनी केले आहे.

संत तुकाराम नगर पिंपरी येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आभिजात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. जेष्ठ साहित्यिक सुरेश कंक हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मानवी हक्क व जागृती चे अध्यक्ष अण्णा जोगदंड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्य संयोजक केंद्रप्रमुख अनिल कारळे यांनी प्रास्ताविक केले.

सुरेश कंक म्हणाले, अभिजात दर्जा मिळण्यासाठी शहरातील साहित्यिकांनी लक्षणिक उपोषण केले, पथनाट्यातुन जनजागृती केली . सर्वांच्या प्रयत्नामुळे आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे सार्थ अभिमान आहे. अण्णा जोगदंड म्हणाले, भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी हजारो वर्षाची परंपरा असावी लागते. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे जागतिक स्तरावर भाषेचे महत्त्व वाढले आहे. प्राचीनता, स्वयंभूपना अशा सर्व निकषांमध्ये मराठी भाषा बसली आहे. सुरेखा मोरे ,संगीता क्षीरसागर ,शैलजा आवडे ,प्रतिभा गोसावी ,सोनल बोबले ,ऐश्वर्या गायकवाड ,निशा भोसले, जयश्री आडसूळ, पल्लवी डावकर यांनी संयोजन केले. केंद्राचालक अनिल कारळे यांनी सूत्रसंचालन केले.

# रमेश बर्गे यांचे निधन



कराड : शेणोली (ता. कराड) येथील ज्येष्ठ नागरिक व राष्ट्रपती पदकाने सन्मानित झालेले सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रमेश बाबुराव बर्गे (वय ६६) यांचे अकस्मात दुःखद निधन झाले. रमेश बाबुराव बर्गे यांनी तब्बल ३६ वर्षे पुणे ग्रामीण पोलीस विभागात सेवा बजावताना उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या उत्कृष्ट सेवेत योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पदक तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने विशेष सन्मान प्राप्त झाला होता.त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे.रक्षाविसर्जन रविवार दि. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी शेणोली येथे होणार आहे.

# शैक्षणिक क्षेत्रात कर्मवीरांचे मोठे योगदान : प्रा.सुमंत जगताप




ढेबेवाडी : ग्रामीण व बहुजन समाजाच्या शिक्षणाचे मोठे कार्य कर्मवीरांनी केले आहे. मुलांनी शिक्षण घेऊन समाज जागृती करावी, तसेच आपल्याच बांधवांना शिक्षणासाठी मदत करावी हा त्यांचा विचार होता.

मुलांनी कष्ट व परिश्रम करून शिकावे यासाठी त्यांनी कमवा आणि शिका या तत्त्वावर आधारित विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज अशा थोर व्यक्तींकडून प्रेरणा घेऊन त्यांनी शैक्षणिक कार्य केले. असे प्रा.सुमंत जगताप म्हणाले.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात नुकतीच कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रा.दत्तात्रय रैनाक म्हणाले, कर्मवीरांनी शिक्षणाचे लावलेले रोपटे त्याचा आता वटवृक्ष झाला आहे. गरिबांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी अथक प्रयत्न केले. स्वावलंबनातून शिक्षण हे तत्व घेऊन त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. रयत बँकेचे माजी चेअरमन प्रा.व्ही.पी. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्वरा देशमुख हिने कर्मवीरांच्या जीवनातील अनेक घटना सांगितल्या.

प्राचार्य एम. एस. पाटील, रयत बँकेचे संचालक विक्रमसिंह देसाई,स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य प्रसाद जानुगडे, सौ अनिता कडव, प्रा.डॉ. दादाराम साळुंखे, निलेश परदेशी,भरत कुंभार उपस्थित होते. प्रास्ताविक निवास जाधव यांनी केले तर आभार राम कापसे यांनी मानले. सूत्रसंचालन सौ. रोहिणी जाधव यांनी केले.

# कोजागिरी पौर्णिमा

हा एक शुभ दिवस मानला जातो. शिवाय याला धार्मिक महत्त्वही खूप आहे.या दिवशी देवी लक्ष्मी चा जन्म झाला. असे मानले जाते. या दिवशी चंद्र पूर्ण १६ कलांनी युक्त असतो. याला पौराणीक ही महत्त्व आहे या दिवशी समुद्रमंथनातून धन व समृद्धीची देवी लक्ष्मी प्रकट झाली होती. म्हणून हा दिवस लक्ष्मीला समर्पित आहे.

या रात्री दारासमोर दिवा लावून त्याची पूजा करतात. आणि चंद्राची पूजा करून त्याला दूध खिरीचा निवेद्य दाखवतात. या दिवशी गायीची पूजा पण करतात. साक्षात लक्ष्मीदेवी चंद्र मंडलातून येऊन पृथ्वीवर उतरते आणि मध्यरात्री कोण जागत आहे.म्हणजे कोण जागरण करत आहे!! असा नसून तर तो, शरीराची, घराची, आपल्या आजूबाजूच्या परिसरातील स्वच्छता पाळण्यात, आरोग्याची काळजी घेण्यात आपल्या कर्तव्याचे पालन करण्यात कोण जागरुक आहे? असा आहे.श्री लक्ष्मी देवी आपल्यावर प्रसन्न राहावी! म्हणून आरोग्य आणि मानसिक प्रसन्नता यासाठी सुद्धा जागरूक रहायला हवे.शिवाय शास्त्रीय कारणानुसार शरद पौर्णिमेच्या रात्री चंद्र पृथ्वीच्या अगदी जवळ असतो. त्याच्या किरणांचे रासायनिक घटक पृथ्वीवर पडतात. अशा चंद्राच्या प्रकाशात खीर किंवा दूध ठेवल्यामुळे हे घटक त्यांच्यामध्ये शोषते जातात. या रासायनिक घटकांमध्ये अनेक जीवनसत्वे व खनिजे असतात. ती आरोग्यासाठी खूप लाभदायक असतात. त्याच्या सेवनामुळे व्यक्तीची रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. त्यामुळे त्याला असणाऱ्या श्वसनाच्या समस्या ,त्वचारोग, कफ या विकारापासून तो मुक्त होतो. आरोग्याच्या दृष्टीने या पौर्णिमेला आयुर्वेदात अत्यंत महत्त्वाचे स्थान मानले जाते.

– **श्रीमती वासंती लावंघरे,** सातारा.

# संवर्धित मोत्यांची शेती करणे आवश्यक




कराड : रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराडमध्ये प्राणिशास्त्र विभागामार्फत संवर्धित मोत्यांची शेती या विषयावर कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

य प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री दिलीप कांबळे उपस्थित होते. त्यांनी या कार्यशाळेत मोत्यांचा इतिहास व त्यांचे महत्त्व मोती तयार करण्याची प्रक्रिया, मोती तयार करताना येणाऱ्या अडचणी व त्यासाठी लागणारा कालावधी यासंबंधी माहिती व प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दिले तसेच प्रवर्तित मोत्यांची शेती व्यवसाय करण्यासाठी लागणारे आवश्यक सामग्री व प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी काळाला अडसरून व्यवसायकडे वळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केली. प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक स्वागत व पाहुण्यांचा परिचय प्राणिशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक डॉ. ए.यू. सुतार यांनी करून दिला. आभार प्रा. डॉ. निर्मला पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. इरम खान यांनी केले ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्रा. डॉ. वैशाली शेवाळे, प्रा. डॉ. सतीश पार्टे, प्रा. डॉ. पल्लवी खैरमोडे व प्रा. सुलक्षणा साडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन – ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा – ४१५११० येथून प्रकाशित केले. ✻ संपादक – गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# रक्तदान शिबीर संपन्न




कराड : रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय आणि सौ. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय कराड तसेच महाविद्यालयातील हेल्थ सेन्टर, एन. एस. एस. , एन. सी. सी. आणि जिमखाना यांचे संयुक्त विद्यमाने, पदमभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ. मोहन राजमाने आणि रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. यशोवर्धन पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

प्राचार्य डॉ. मोहन राजमाने म्हणाले, महाविद्यालयात अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. रक्तदान श्रेष्ठदान आहे. आपण सर्वांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली पाहिजे. सर्व सेवकांनी आणि विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभागी होऊन गरजू रुग्णांना मदत केली पाहिजे. डॉ. यशोवर्धन पाटील यांनी रक्तदानाचे महत्व पटवून दिले.

सदर शिबीर यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्य डॉ. यु. बी. मोरे, डॉ. आर.पी. पोळ, हेल्थ सेन्टरचे प्रमुख प्रा. डॉ. ए. यु. सुतार, एन. सी. सी. प्रमुख डॉ. संदीप महाजन, एन.एस.एस. प्रमुख डॉ. अभय पाटील, जिमखाना प्रमुख डॉ. विद्या पाटील तसेच प्रा. सचिन चव्हाण, उपजिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे सर्व कर्मचारी यांनी विशेष प्रयन्त केले.

प्रास्ताविक प्रा. डॉ. ए. यु. सुतार यांनी केले. आभार प्रा. विजया निकम यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सचिन चव्हाण यांनी केले. या शिबिरात प्रा. विकास गायकवाड, डॉ. कमलाकर पाटील यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेची निवडणूक अपात्र

## निवृत्त न्यायमुर्ती पी.के.चव्हाण प्रशासक म्हणून नियुक्त

कराड : राष्ट्रीय क्रीडा आचारसंहिता धाब्यावर बसवून झालेल्या महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाच्या द्विस्तरीय खंडपीठाने शुक्रवारी अपात्र ठरवले.

न्यायमूर्ती अव्दैत सेठना आणि न्यायमूर्ती एम. एस. सोनक यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय देत निवृत्त न्यायमुर्ती पी. के. चव्हाण यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील १५ दिवसांत त्यांच्याकडे कार्यभार सोपवून चार महिन्यांच्या आत आचारसंहितेनुसार निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

ही माहिती सातारा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनचे सहसचिव प्रा. अशोक चव्हाण आणि राष्ट्रीय खेळाडू फिरोज पठाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताराव पवार, कार्याध्यक्ष शामराव अष्टेकर, उपाध्यक्ष अमीर खान, अनंत गोखले, संजय शिंदे, नंदकुमार वाघ, सचिन पाटील, अमोल पाटील, सौ. सीमा जाधव आदींच्या मान्यतेने सदर याचिका दाखल करण्यात आली होती.

जुलै २०२४ मध्ये झालेल्या राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणुकीविरोधात प्रा. अशोक चव्हाण, फिरोज पठाण आणि राष्ट्रीय खेळाडू सचिन भोसले यांनी न्यायालयात स्वतंत्र याचिका दाखल केल्या होत्या. न्यायालयाने त्यावेळीच निवडणुकीच्या निकालाला स्थगिती दिली होती. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत निवडणूक अपात्र ठरवून प्रशासक नेमण्याचा निर्णय देण्यात आला.

याचिकेवर सातारा जिल्हा कबड्डी असो. च्या वतीने अ‍ॅड. वैभव गायकवाड आणि सचिन भोसले, तर राज्य संघटनेच्या वतीने वकील गणेश गाडे यांनी बाजू मांडली.

क्रीडा संहितेचे पालन न केल्यामुळे अनेक जिल्हा संघटनांनाही प्रतिवादी करण्यात आले आहे. राज्य संघटनेचे सचिव बाबुराव चांदोरे (पुणे), खजिनदार मंगल पांडे यांच्यासह काही पदाधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभारामुळे आणि वाद न मिटविण्याच्या भूमिकेमुळे अखेर या जुन्या कबड्डी संघटनेवर प्रशासक नेमण्याची वेळ आल्याचे सांगण्यात आले.

संघटनेची निवडणूक पारदर्शी आणि आचारसंहितेनुसार व्हावी एवढीच अपेक्षा होती. मात्र त्याला बगल देण्यात आल्याने न्यायालयाची पायरी चढावी लागली, असे प्रा. चव्हाण यांनी सांगितले.

स्व. बबनराव उथळे यांच्या कार्यकाळातील सातारा जिल्हा कबड्डी असो. च्या कारभाराविरोधातही सध्या धर्मादाय आयुक्त कार्यालयात सुनावणी सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

# सांगली जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान




इस्लामपूर : सांगली जिल्ह्यातील आयुष आरोग्य सेवेसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत एनबीएच राष्ट्रीय आरोग्य मानांकन पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत सांगली जिल्ह्यातील चार वैद्यकीय अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यामध्ये डॉ. राहुल गौर (भवानीनगर, ता. वाळवा), डॉ. शरद कुवर (कसबे डिग्रज), डॉ. मंदाकिनी नागरगोजे (बुधगाव, ता. मिरज) व डॉ. प्रियगंधा खंबाळकर (आमणापूर, ता. पलूस), डॉ. सोमनाथ अंकोलीकर (येडेनिपाणी, ता. वाळवा) यांना सन्मानित करण्यात आले.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, या पुरस्कारामुळे सांगली जिल्ह्यातील आयुष आरोग्य संस्थांनी सर्वसमावेशक व दर्जेदार आरोग्यसेवा देण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ, उपसंचालक, कोल्हापूर विभाग डॉ. दिलीप माने तसेच जिल्हा आयुष अधिकारी डॉ. वैशाली पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# अहिल्यादेवींचे कार्य कालातीत : प्रा.डॉ.मानसिंग ठोंबरे





इस्लामपूर : समाजहिताचा दृष्टीकोन आणि सुयोग्य नियोजन यामुळेच अहिल्यादेवींचे कार्य कालातीत ठरते. त्यांचे जीवन हे स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दाखवलेली कार्यतत्परता आणि धीर आजच्या काळातील तरुण पिढीसाठी दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. मानसिंग ठोंबरे यांनी येथे केले.

येथील नागेश युनिव्हर्सल मंडळ, लोणार गल्ली, उरूण-इस्लामपूर यांच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत ते 'कर्मयोगिनी अहिल्या' या विषयावर बोलत होते. राजवर्धन पाटील अध्यक्षस्थानी होते.डॉ. ठोंबरे म्हणाले, अहिल्यादेवींनी नद्या-जोडणी, विहिरी-तलाव बांधणी व शाश्वत जलव्यवस्थापनावर दिलेला भर आजही आपल्याला मार्गदर्शक ठरतो. दुष्काळाशी सामना करण्यासाठी त्यांचे कार्य हे आजच्या समाजासाठी शिकवणूक आहे. अहिल्याबाई होळकर यांनी प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य, परोपकार आणि प्रजाहितकारी कार्याचा आदर्श घालून दिला. जर चौंडी गावातील एक बाई महाराष्ट्रातून थेट दिल्लीच्या तख्ताला जाऊन धडक देऊ शकते, तर तुमच्यातली कुठलीही एक बाई कसलंही मोठं स्वप्न साकार करू शकते. सुधीर बंडगर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आदेश कोळेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समृद्धी सपकाळ यांनी सूत्रसंचालन केले. राजवर्धन कोळेकर यांनी आभार मानले.

# बालकांच्या सुद्दढतेसाठी पोषक आहार महत्त्वाचा : प्रतिभा लोंढे



उंब्रज : नांदलापूर, ता. कराड येथील अंगणवाडी केंद्राच्या वतीने बीटस्तरीय पोषण माह सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्धाटन एकात्मिक बाल विकास प्रकल्प सहाय्यक अधिकारी प्रतिभा लोंढे,पर्यवेक्षिका सविता कुडतरकर,यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य राजाराम शिर्के,मुख्याध्यापक प्रवीण लादे ,पदवीधर शिक्षक नारायण सातपुते,शोभा पाटील,नयन पाटील,आरोग्य विभागाच्या आरोग्यसेविका सौ जाधव, मदतनीस दिपा शिर्के उपस्थित होते.

यावेळी प्रतिभा लोंढे यांनी बालकांच्या तसेच मातेच्या पोषणासाठी आवश्यक असणारे घटक जीवनसत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच गर्भवती माता, स्तनदा माता आणि बालकांचे वजन मोजणी, पोषण सल्ला देणे, तसेच संतुलित आहाराचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी 'सुपोषित भारत सशक्त भारत' हा संदेश देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले.यावेळी अंगणवाडी कार्यकर्त्या व सहायिका यांनी पोषण आहाराचे प्रदर्शन, लहान मुलांसाठी आरोग्यदायी खाद्यपदार्थांची प्रदर्शनी आणि घोषवाक्य स्पर्धा आयोजित केली. प्रास्ताविक सविता कुडतरकरयांनी केले. सूत्रसंचालन व आभार अंगणवाडी सेविका उज्वला शिर्के यांनी केले.

# मुस्लिम समाज ई बी सी सब कोटा अंतर्गत समावेश करावा




शिराळा :शिराळा तालुका मुस्लिम समाजाच्या वतीने मुस्लिम ओबीसी घटकांचा ई बी सी सब कोटा अंतर्गत समावेश करून लाभ समाजातील उप जातींना देण्यात यावा असे निवेदन मा. तहसीलदार शिराळा यांना देण्यात आले यावेळी शिराळा राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष ड. रवी पाटील म्हणाले की , शासनाने मुस्लिम समाज मुख्य प्रवाहात यावा यासाठी ओबीसी सब कोटा निर्माण करण्या बाबत सहानुभूतीने विचार करणे गरजेचे आहे . एकूण मुस्लिम समाजाचा मागासलेपण याने कमी होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

वंचित बहुजनचे नेते ड. प्रा . सम्राट शिंदे यांनी यावेळी पाठिंबा देत मुस्लिम समाजाची मागणी ही शैक्षणिक , आर्थिक दृष्टीने न्याय असून घटनेतील तरतूद पाहता शासनाने अत्यंत सहानुभूतीने विचार करून निर्णय घ्यावा या मागणीच्या पूर्ततेसाठी सर्वोतोपरी मदत करू असे मत त्यांनी व्यक्त केले. मुस्लिम समाजाच्या वतीने अ‍ॅड. नादिर मुजावर निवेदन देताना म्हणाले की , आमची मागणी धर्माच्या आधारावर नसून मुस्लिम समाजातील मागासलेपण , आर्थिक व शैक्षणिक लाभ मिळत नसल्या बाबत असून जर सब कोटा निर्माण केला तरच मुस्लिम समाज आर्थिक , शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मुख्य प्रवाहात येईल . राज्याच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी समाज मुख्य प्रवाहात येणे फार गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. यावेळी मुस्लिम समाजाच्या वतीने दस्तगीर अत्तार , खलील मोमिन, अ‍ॅड. गौस मुजावर, फिरोज मुजावर, मोहन पाटील (माजी सरपंच प.त.वारुण) मुस्तफा मुल्ला, शफी मुल्ला, मेहबूब मुल्ला, इकबाल संदे, सिकंदर पठाण, मुर्तुझा घाशी, रफिक अत्तार, डॉ अजीम मुल्ला, जावेद नदाफ, हमीद मुल्ला, सिकंदर मुजावर, समीर मेहतर, जमीर नायकवडी, जावेद काजी इत्यादी उपस्थित होते.

# एम.एच.५३ डी. मालिका सुरु

सातारा : सातारा जिल्हयात दुचाकी वाहनांसाठी दिनांक ६ ऑक्टोबर पासुन एम एच ५३ डी ०००१ ते ९९९९ ही नवी मालिका सुरु करण्यात येत आहे. ज्यांना आपल्या वाहनास आकर्षक क्रमांक घ्यायचे आहेत त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधुन आपले आकर्षक क्रमांक फी भरुन आरक्षित करुन ठेवावेत. तसेच दुचाकी मालिकेतील क्रमांक इतर वाहनांसाठी हवा असल्यास नियमानुसार तिप्पट फी भरुन नोंदणी क्रमांक देण्यात येईल, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी फलटण संदिप म्हेत्रे यांनी कळविले आहे.

पंसतीचा नोंदणी क्रमांक देण्याकरीता प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार नोंदणी क्रमांक काटेकोरपणे नेमून देण्यात येईल. अर्जासोबत विहित पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकीत प्रत सादर करणे आवश्यक राहील. अर्जदाराने त्याचे स्वत:चे ओळखपत्र उदा. आधारकार्ड, निवडणूक आयोग ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड यांची सांक्षाकित प्रत तसेच वाहनचालकाचा वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल नंबर, पिन कोड नंबर देणे बंधनकारक राहिल. ६ ऑक्टोबरपर्यंत जे वाहनधारक वाहनासाठी तिप्पट फी भरुन दुचाकी वाहन मालिकेतील वाहन क्रमांक घेण्यास इच्छुक आहेत त्यांचे चारचाकी वाहनांचे एल एम व्हि अर्ज सकाळी १० ते २ दोन वाजेपर्यंत धनाकर्षासह स्विकारले जातील. ज्या आकर्षक क्रमांकासाठी एकच अर्ज प्राप्त झाला असेल त्यास त्याच दिवशी आकर्षक क्रमांक देण्यात येईल. मात्र एकापेक्षा जास्त अर्जदारांनी पसंतीच्या नोंदणीक्रमांकासाठी अर्ज केला असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत निर्धारित फी पेक्षा जास्त रकमेचा धनाकर्ष बंद लिफाफ्यात सादर करावा. जो अर्जदार जास्तीत जास्त रकमेचा धनाकर्ष सादर करेल त्यास पसंतीचा क्रमांक देण्यात येईल.

# शामगाव घाटात कॉंक्रीटीकरणाचे मशीन अडकल्याने वाहतूक ठप्प



मसूर : मायणी-मल्हारपेठ राज्य मार्गाच्या कामामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत असलेल्या शामगाव (ता. कराड) घाटात शुक्रवारी दुपारी कॉंक्रीटीकरणाचे मशीन रस्त्यात अडकल्याने तब्बल दोन तास वाहनांची लांबच लांब रांग लागून वाहतूक ठप्प झाली. त्यामुळे प्रवासी आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

गेल्या तीन महिन्यांपासून या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व रुंदीकरण सुरू असून, घाट परिसरातील दोन्ही बाजूचे रस्ते उखडल्यामुळे वारंवार कोंडी व अपघात होत आहेत. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास घाट माथ्यावरून पायथ्याकडे येत असताना कॉंक्रीटीकरणाचे अवजड मशीन मध्येच अडकल्याने घाटातील दोन्ही बाजूंनी वाहने अडकली. साडेचार वाजता मशीन मार्गस्थ केल्यानंतरच वाहतूक सुरळीत झाली.

दरम्यान, घाटात वाहतूक व्यवस्थापनाऐवजी मसूर पोलिस कर्मचारी चिरीमिरी गोळा करण्यात गुंतले असल्याच्या ग्रामस्थांच्या तक्रारी वाढत आहेत.

**नियोजनशून्य कारभारामुळे घाटात सतत कोंडी होत असून प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मशीन अडकल्याने दोन तास वाहतूक ठप्प झाली. अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. - रेवण सुर्यवंशी, प्रवासी, शामगाव**

# कल्पनांच्या पंखाला शब्दबद्ध करताच कविता होते : उत्तम सावंत




इस्लामपूर : 'कला साहित्याचा गुण प्रत्येकाच्या अंगी येणे आवश्यक आहे. शिक्षक आई-वडील सध्या व्हिलन होत आहेत १ क्षण भाळण्याचा आणि ९९ सांभाळण्याचा आहे. मुलीनी स्वत: ला सावरणे काळाची गरज आहे. काळ अतिशय वाईट आहे. जागतिकीकरणाच्या नादात जवळच्या गोष्टी सुटू लागल्या आहेत.

सोशल मीडियाच्या जमान्यात माणूस आतून कुरतडला गेलाय' असे विचार कवी उत्तम सावंत यांनी मांडले ते मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयात, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग व अग्रणी महाविद्यालय अंतर्गत आयोजित अभिजात मराठी भाषा दिवस व पंडित दीनदयाळ उपाध्याय हिरकमहोत्सवी वर्षा निमित्त, 'कविता कशी सुचत? या विषयावरील चर्चासत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अंकुश बेलवटकर होते व प्रा. के .बी. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कवी उत्तम सावंत पुढे म्हणाले की, 'कल्पनांच्या पंखांना शब्दबद्ध करताच कविता होते. मातीशी नाळ जोडा मनाच्या पातळीवरील लहरी त्या त्या वेळेस जपल्या व लिहिल्या पाहिजेत. त्यासाठी विस्तृत वाचन आवश्यक आहे. वाचाल तर वाचाल, जगाल व समृद्ध व्हाल. कवितेची धडपड ही शांततेत उमलते. कधी पावसाच्या थेंबात, कधी सूर्याच्या किरणात कधी माणसाच्या वेदनेत तर कधी प्रेमाच्या स्मरणात. कविता निर्माण होत असते. प्राचार्य. डॉ. अंकुश बेलवटकर म्हणाले की,'भावनांना शब्द सापडला की कविता होते. मराठी साहित्याला समृद्ध वारसा आहे. तो आपण सर्वांनी सांभाळला व वाढवला पाहिजे. प्रतिभा शक्ती जागृत ठेवा निश्चितच आपल्यातील अनेक कवी निर्माण होतील. स्वागत व प्रास्ताविक प्रो. डॉ.शीला रत्नाकर यांनी केले. आभार प्रा. संजय चव्हाण यांनी मांनले. प्रा.स्वाती चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.

# यंदा सह्याद्री दिवाळी गोड करणार : माजी मंत्री बाळासाहेब पाटील

## कामगारांसाठी कामगार भवन बांधणार;५८ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणार

मसूर : सह्याद्री व्यवस्थापनाने नवीन विस्तार वाढ प्रकल्पाच्या ट्रायल बरोबरच एक लाख लीटरक्षमतेचा इथेनॉलचा प्लांट सुरू करून त्याची इतर उत्पादने घेणार असल्याचे सांगून कामगारांसाठी सुसज्ज कामगार भवन बांधणार आहे.

दिवाळीला कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे बोनस व सभासदांना गतवर्षीचा पन्नास रुपयांचा हप्ता आणि शेतकऱ्यांच्या जमा ठेवीवरील ५८ लाख रुपये व्याजाची रक्कम ही दिनांक ७ ऑक्टोबर दरम्यान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल तर शेतकऱ्यांना मोफत गाव पोच साखर ही मिळेल असे आश्वासित करून सह्याद्री कोणत्याही संकटाला डगमगत नाही आणि सह्याद्री कोणाची देणे ठेवत नाही. त्यामुळे तुम्ही निश्चिंत रहा असे ठणकावून सांगत यंदा सह्याद्री दिवाळी गोड करणार असल्याचे संकेत सह्याद्रीचे चेअरमन तथा माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिले.

यशवंतनगर ता कराड येथील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या ५२ व्या गणित हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन कारखान्याचे व्हाईस चेअरमन कांतीलाल भोसले पाटील व त्यांच्या पत्नी सौ संध्या रजनी भोसले यांच्या हस्ते संपन्न झाला त्याप्रसंगी चेअरमन बाळासाहेब पाटील बोलत होते याप्रसंगी युवा नेते जशराज पाटील कराड मार्केट कमिटीचे संचालक मानसिंगराव जगदाळे कराड मर्चंट संस्थेचे चेअरमन माणिकराव पाटील जिल्हा सहकार बोर्डाचे संजय साळुंखे प्रणव ताटे सोमनाथ जाधव बबनराव कदम तारगावच्या सरपंच सौ सुनीताताई पाटील चेअरमन धन्यकुमार जाधव निवासराव पाटील गोविंदराव थोरात माझी व्हाईस चेअरमन लक्ष्मीबाई गायकवाड या सह कारखान्याचे अधिकारी वर्ग यांची प्रमुख उपस्थिती होती.




कृषी औद्योगिक क्षेत्राचा स्व यशवंतराव चव्हाण यांनी पाया घातला तर स्वर्गीय पी डी पाटील यांचे संपूर्ण कार्यक्षेत्र बागायत व स्थानिकांना रोजगाराचे स्वप्न पूर्णत्वास जात असून जिराईत शेतकरी बागायत झाला याचा मनस्वी आनंद मोठा आहे यंदा सह्याद्री कडे २०२०३ हेक्टर उसाची नोंद झाली असून १४ लाखावर गळीत अपेक्षित आहे ऊस तोडणी च्या २३ मशीन इतर यंत्रणा मजूर व वाहने सक्षम असून ऊस तोडणी साठी शेती विभाग दक्ष आहे नोंदलेल्या सर्व उसाच्या गळीताची नैतिक जबाबदारी सह्याद्रीची असून गतवर्षी एक नैतिकता म्हणून खाजगी कारखान्यांच्या उसाचे गाळप केले असल्याचे सांगून चेअरमन बाळासाहेब पाटील म्हणाले नैसर्गिक आपत्ती व ब्लास्ट मुळे नवीन प्लांटला उशीर झाला हे तत्वतः मान्य असून त्याचे काम पूर्ण होत असून यावर्षी त्याची ट्रायल घेणार आहे.

भविष्यात नव्या जुन्या प्लांट सुरू झाल्यास कार्यक्षेत्रातील ऊस तोडणीच्या सर्व तक्रारी संपुष्टात येतील इथेनॉलचा चांगला फायदा होत असून यंदा एक लाख लिटर क्षमतेचा इथनाल प्लांट सुरू करून त्याचे इतर उत्पादनही घेणार आहोत इथेनॉलचा प्रति लिटर ८० रुपये ७५ पैसे दर असून सदरचे दरही वाढतील त्याचा अधिकचा फायदा ही मिळेल. क्षणिक पर्यायासाठी खाजगीकडे ऊस देऊन नुकसान करू नका खाजगीकडे ऊस गेल्या सोसायटी थकीत जातात त्या मुळे १०१ ची प्रकरण नावीलाजास्तव होतात कधीतरी देणे द्यावेच लागते तेव्हा हे कटू प्रसंग टाळावेत असे सूचित करून हल्ली ज्यांचा ऊस नाही तेच तक्रार करतात मात्र सह्याद्री हा दिलेले शब्द पाळणारा आहे त्यामुळे सहकार जोपासण्याचे काम सभासद शेतकऱ्यांनी करावे.

कांतीलाल पाटील म्हणाले सह्याद्री कार्यक्षेत्रात ३५ पाणीपुरवठा संस्था कार्यरत असून माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या पाठपुराव्यानेच हणबरवाडी धनगरवाडी पाणी योजना पूर्णत्वास जात आहे.

दूरदृष्टीतून केलेली विस्तार वाढ आणि कार्यक्षेत्रात आर्थिक सुबत्तेचे सह्याद्री हा केंद्रबिंदू आहे सह्याद्रीने उच्चांकि दराची परंपरा कायम ठेवली असून खाजगी कारखानदारीचा पर्याय झाला तर लवकर ऊस घालण्याच्या नादात सभासदांनी आर्थिक नुकसान करू नये सर्वांनी सह्याद्रीच्या पाठीशी ठाम राहून चेअरमन बाळासाहेब पाटील यांच्यासारख्या नेतृत्व जपावे असे आवाहन केले.

प्रारंभी ज्यांनी सह्याद्रीची सेवा केली त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून २३ निवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. स्वागत कार्यकारी संचालक विश्वजीत शिंदे यांनी केले.

सूत्रसंचालन दादासाहेब पाटील सुपनेकर यांनी केले आभार अण्णासो पाटील यांनी मानले. कार्यक्रमास कार्यक्षेत्रातील आजी-माजी जिल्हा परिषद पंचायत समितीचे सदस्य संचालक विविध संस्थांचे पदाधिकारी कारखान्याचे अधिकारी कर्मचारी वर्ग सभासद सभासद शेतकरी उपस्थित होते.

### प्रत्येक संकट प्रसंगी सह्याद्री अग्रेसर...!

ज्या ज्या वेळी राज्यावर संकट आली त्या त्यावेळी सक्षमपणे दिलासा देण्याची सह्याद्रीची आग्रही भूमिका कायम राहिली आहे. गत पाच वर्षात मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दोन कोटी ६६ लाख ६९ हजार ९९५ अदा केले आता स्वनिधी देण्याचे धोरण असून शासनाच्या धोरणानुसार प्रति टनी पंधरा रुपये कपातीचा निर्णय पूरग्रस्तांसाठी घेण्यात आला असल्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले.

### कामगार भावनांची उभारणी व कर्मचाऱ्यांना बोनस...!

सह्याद्रीने सतत संघर्ष केला मात्र तो कधी डगमगला नाही कारखानदारी अडचणीत असली तरी युनियनला सहकार्य करण्याची भूमिका आहे कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे बोनस देऊ त्यांच्यासाठी सुसज्ज कामगार भवन उभारणार असून कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करा चुका करू नका यात संस्थेचे च नुकसान होत आहे मागील काही चुका मानवी झाल्या मात्र त्या मशिनरीच्या नव्हत्या असे स्पष्ट करून सांघिक कामे करा जिथे काम करता त्या लक्ष्मी चे नुकसान करू नका सह्याद्री कोणाचे देणे ठेवत नाही तुम्ही निश्चिंत रहा असे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी यांनी आश्वासित करताच टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत झाले.

# आर्थिक लाभासाठी अर्ज करावेत

सातारा - शैक्षणीक संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या मान्यताप्राप्त शासकीय, अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय, तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेणाऱ्या व वसतिगृह योजनेपासून वंचित असणाऱ्या धनगर समाजातील विद्यार्थी निवासी व शैक्षणिक सुविधांपासुन वंचित राहू नये यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणारे व ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाख पेक्षा कमी आहे असे विद्यार्थी पात्र असून जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास प्रतिवर्ष ४३ हजार व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रुपये ३८ हजार प्रमाणे लाभाचे वितरण केले जाणार आहे. या योजनेंतर्गत १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए, एम.एससी असे पदवीनंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या प्रथम, व्दितीय, तृतीय वर्षाकरिता ऑनलाईन अर्ज २६ऑक्टोबर पर्यत http://hmas.mahait.org वर प्रवेश अर्ज भरता येणार आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या धनगर समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्यान विभागाच्या सहायक संचालक कांचन जगताप यांनी केले आहे.

# पाटण-पंढरपूर रस्त्याच्या कामातील दर्जा सुधारावा

## अन्यथा १५ ऑक्टोबरला रास्ता : मानसिंगराव जगदाळे

मसूर : पाटण-पंढरपूर रस्त्याचे काम अत्यंत धीमे गतीने, निकृष्ट दर्जाचे आणि नियोजनशून्य पद्धतीने सुरू असल्याचा आरोप करत हे काम क्वालिटी कंट्रोल विभागाने तपासून तातडीने सुधारावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे नेते व माजी शिक्षण समिती सभापती मानसिंगराव जगदाळे यांनी केली. हे काम त्वरीत सुधारले नाही तर १५ ऑक्टोबर रोजी मसूर एसटी स्टँड चौकात तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी पत्रकार परिषदेत दिला.



यावेळी सह्याद्री कारखान्याचे संचालक दिनकरराव शिरतोडे, माजी सरपंच पंकज दीक्षित, प्रकाश माळी, विजयसिंह जगदाळे, रमेश जाधव, महेश घाटगे, तात्यासाहेब पाटोळे, सिकंदर शेख, जमीर मुल्ला आदी उपस्थित होते.

मानसिंगराव जगदाळे म्हणाले, आशियाई विकास बँक व राज्य शासनाच्या ४०० कोटींच्या खर्चातून पाटण-पंढरपूर रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण सुरू आहे. मात्र म्हासुर्णे-मसूर या भागात अपेक्षित रुंदीपेक्षा कमी रुंदीने आणि निकृष्ट दर्जाचे काम चालू आहे. पुलांची उंची वाढविणे, गटारांची बांधकामे अपूर्ण आहेत. दोन्ही बाजूचे रस्ते एकाचवेळी उकरल्याने वाहनधारक त्रस्त झाले असून अपघातांचाही धोका वाढला आहे.तसेच मसूर एसटी स्टँड चौक ते शहापूर फाटा रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून, वाहतुकीस धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याचे रुंदीकरण-डांबरीकरण तातडीने करणे आवश्यक आहे. कराड तालुक्यातील खोडजाईवाडी, किवळ, चिखली, निगडी आदी रस्त्यांसाठी २०० कोटी निधी मंजूर असूनही काम प्रलंबित आहे. ते सुरू करण्याचे आदेश तातडीने द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

### जुन्या अर्थसंकल्पातीलच कामे सुरू

माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या प्रयत्नांतून २०२१ च्या पुरवणी अर्थसंकल्पात या रस्त्यांची कामे समाविष्ट झाली होती. सध्या त्याच जुन्या प्रस्तावांवरील कामेच सुरू असून, नवीन प्रकल्पांना सुरुवात झालेली नाही. योग्य वेळी याबाबत पुराव्यासह उत्तरे देऊ, असा इशाराही जगदाळे यांनी दिला.

### गावच्या प्रगतीसाठी रस्ते महत्त्वाचे

गावाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर रस्त्यांचा विकास अपरिहार्य आहे. नियमाप्रमाणे रस्ता व्हावा यासाठी आम्ही आग्रही असून, लोकांनी संयम ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन मानसिंगराव जगदाळे यांनी केले.

# समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण माध्यम महत्त्वाचे : सारंग पाटील

मारूल हवेली : समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचे माध्यम अतिशय महत्त्वाचे आहे. हे महत्त्व जाणल्यामुळेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची गंगा बहुजनापर्यंत पोहचवली, असे प्रतिपादन राष्ट्रवादीच्या आयटी सेलचे प्रदेशाध्यक्ष सारंग पाटील यांनी केले. गांधीटेकडी (ता.पाटण) येथे ठक्करबाप्पा माध्यमिक विद्यालयात कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांच्या १३८ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी पोपटराव काटकर, जयवंतराव पाटील, अशोकराव पाटील, अधिकराव पाटील, पांडुरंग नलवडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



सारंग पाटील म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन मानले आणि शिक्षणातून स्वावलंबनाचा विचार रुजवला. शिक्षणाच्या संधींपासून वंचित असलेल्या समाजातील घराघरांत ज्ञान पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत कर्मवीर अण्णांनी मोठे योगदान दिले. शिक्षण समाजात नवीन विचार आणि मूल्यांना प्रोत्साहन देते, ज्यामुळे सामाजिक बदलांना गती मिळते. शिक्षणाच्या मदतीने व्यक्ती आणि समाज दोन्हीची सर्वांगीण प्रगती होते. शिक्षणामुळे व्यक्तींना नवीन कौशल्ये शिकायला मिळतात, त्यांची विचार करण्याची क्षमता वाढते आणि ते समाजासाठी जबाबदार नागरिक बनतात. शिक्षणामुळे समाजात सामाजिक परिवर्तनाला गती मिळते, संपूर्ण समाजाचा विकास होतो. त्यामुळे उत्तम शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी यशाची नवनवीन शिखरे गाठावी. प्रारंभी स्वागत प्राचार्य व्ही.पी.लटके यांनी केले.

# माहिती अधिकार अधिनियमाबाबत सरकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

कराड : सौ. वेणुताई चव्हाण रुग्णालयात नुकत्याच आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात सरकारी अधिकारी व कर्मचारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात ड. डी. आर. पाटील यांनी माहिती अधिकार कायद्याचा योग्य व जनहितासाठी कसा उपयोग करावा, तसेच दुरुपयोग करणाऱ्या कार्यकर्त्यांची ओळख करून त्यांच्याविरोधात कोणत्या पातळीवर कायदेशीर कारवाई करता येते, याबाबत स्पष्ट माहिती दिली.




ड. पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, माहिती अधिकार कायदा हा सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण करणारा प्रभावी कायदा आहे. मात्र, या कायद्याचा गैरवापर होऊ नये यासाठी जागरूकता आवश्यक आहे. राष्ट्रीय सुरक्षेला किंवा देशाच्या शांततेला धोका निर्माण करणारी माहिती कुणालाही देता येत नाही. तसेच कोणती माहिती मागू शकतो व कोणती नाही, याची सविस्तर माहिती प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याने जाणून घेणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील सर्व सरकारी अधिकाऱ्यांना माहिती अधिकार अधिनियमाबाबत योग्य माहिती मिळावी व कायद्याचा वापर पारदर्शकता आणि जनहितासाठी व्हावा या उद्देशाने माहिती अधिकार मार्गदर्शक पंधरवडा आयोजित करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला ड. इरफान सय्यद, कॉटेज हॉस्पिटलचे प्रभारी डॉ. देसाई यांच्यासह रुग्णालयातील मान्यवर उपस्थित होते. सरकारी कर्मचाऱ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेत कायद्याचा वापर अधिक प्रभावी व लोकहितकारी व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# आम्ही कराडकर ग्रुपची मदत पूरग्रस्तांना रवाना

कराड : आम्ही कराडकर चक५० पूरग्रस्त मदत ग्रुपकडून मराठवाड्यातल्या पूरग्रस्त भागात अन्न धान्य तसेच जीवनावश्यक वस्तू, शैक्षणिक साहित्याची मदत आज कराड येथून रवाना झाली. एकूण सहा टेम्पो रवाना झाले.




कराड शहरातील युवकांनी एकत्र येत आम्ही कराडकर चक५० पूरग्रस्त मदत ग्रुप च्या माध्यमातून कराड तालुक्यातून पूरग्रस्त भागासाठी मदत जमा केली. यामध्ये अन्न धान्य तसेच जीवनावश्यक वस्तू, शैक्षणिक साहित्य यांचा समावेश आहे. ही मदत पाटोदा, शिरूर कासार व ब्रम्हनात येळंब या गावात पोहचवली जाणार आहे.

तसेच सदर मदती शिवाय ब्रम्हनात येळंब या गावातील २ घरं सुद्धा बांधून दिली जाणार आहेत.

शिवतीर्थ दत्त चौक येथे पूरग्रस्त भागात मदत घेऊन जाणाऱ्या गाड्यांचे पूजन करण्यात आले.

यावेळी कराडचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, माजी नगरसेवक अतुल शिंदे, सुहास पवार, प्रवीण पवार, साहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक भापकर, मलकापूर नगरपंचायतचे बांधकाम सभापती राजेंद्र यादव, शेती उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश पाटील, अशोक पाटील पोटलेकर, सागर बर्गे, निशांत ढेकळे आदी उपस्थित होते. आम्ही कराडकर ग्रुपचे गणेश पवार, सुशांत इनामदार, विवेक कुराडे- पाटील, मोहन कदम, दत्ता पाटील, शिवाजी चव्हाण, सचिन पाटील, डॉ सत्यजित पाटील, शंकरराव खापे, बाजीराव पाटील आदी सदस्यही मदत घेऊन पूरग्रस्त भागाकडे रवाना झाले.

# कराडमध्ये २४ तास बच्चनगाणींचा जल्लोष

कराड : महानायक अमिताभ बच्चन यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त कराडमध्ये संगीतप्रेमींसाठी आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अमिताभ बच्चन प्रेमी ग्रुप, कराड यांच्या वतीने '२४ तास बच्चनप्रेमी बच्चनगाणी' हा नॉनस्टॉप संगीत महोत्सव १० ऑक्टोबर मध्यरात्रीपासून ११ ऑक्टोबर मध्यरात्रीपर्यंत हॉटेल पंकज एक्झिक्युटिव्ह, कराड येथे रंगणार आहे. या विशेष कार्यक्रमात कराड व सातारा जिल्ह्यातील नामवंत गायक-गायिका तसेच विविध संगीत अकॅडमींचा सहभाग राहणार आहे. स्वरसंस्कार म्युझिक अँड स्पीच अकॅडमी, किशोर कुमार फॅन क्लब कराड, कॅम्पा संगीत अकॅडमी, रॉयल कराओके सिंगिंग ग्रुप, मोहम्मद रफी म्युझिक अकॅडमी, फारूख शेख स्वरगंध परिवार, कराओके सिंगिंग क्लब, स्वरसाज सिंगिंग क्लब, रागमंजिरी ग्रुप, साथिया म्युझिकल तसेच सातारा येथील साज और आवाज स्वरसाधना ग्रुप यांचा यात सहभाग असणार आहे.या कार्यक्रमात फक्त अमिताभ बच्चन यांच्यावर चित्रित झालेली सदाबहार गाणी सलग २४ तास सादर केली जाणार असून, संगीतप्रेमींसाठी हा अद्वितीय मेजवानीचा सोहळा ठरणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून बच्चन चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क : – डॉ. नितीन जाधव – ९४२२०३९५०६, सतीश मोरे (सतिताभ) – ९८८११९१३०२, सतीश भोंगाळे – ९३७२६०५७२९.**